मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४९१३८४८२



# पवना उगमापासून स्वच्छ होणार!

## खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पवना आणि इंद्रायणी नद्या अलीकडच्या काळात प्रदूषित झाल्या आहेत. दोन्ही नद्या उगमापासून स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी अमृत योजनेअंतर्गत कामे केली जाणार आहेत. नदी सुधार प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्राकडे गेला आहे. केंद्राच्या मान्यतेनंतर तत्काळ कामांना सुरुवात होईल. नद्यांमध्ये प्रदूषित पाणी जाऊ नये यासाठी इंद्रायणी व पवना नदी काठच्या सर्व ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) उभारण्यात येणार आहेत, अशी माहिती मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. पवना आणि इंद्रायणी नद्यांच्या स्वच्छतेच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींसह प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीसाठी आमदार अश्विनी जगताप, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, महापालिका आणि पीएमआरडीएचे संबंधित अधिकारी या बैठकीसाठी उपस्थित होते. पवना आणि इंद्रायणी नदी उगमापासून स्वच्छ करणे आणि प्रदूषण मुक्त करणे या संदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून मागील काही वर्षांपासून काम सुरु आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून पवना आणि इंद्रायणी नदी स्वच्छ करण्याचा एक प्रकल्प हाती घेतला आहे. अमृत योजनेअंतर्गत याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. याबाबत खासदार श्रीरंग बारणे सातत्याने केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचा ५७७.१६ कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल ऑगस्ट २०२३ मध्ये राज्याच्या पर्यावरण विभागाकडे सादर करण्यात आला. राज्याने यास मान्यता दिली असून आता हा अहवाल केंद्राच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडे (एनआरसीडी) सादर करण्यात आला आहे. एनआरसीडी कडून ६० टक्के अनुदान आणि राज्य शासन ४० टक्के अनुदान देणार आहे. इंद्रायणी नदीच्या तीरावर एकूण ४८ गावांमधील पाणी प्रक्रिया करून नदीत सोडण्याबाबत नियोजन केले जात आहे. यामध्ये लोणावळा, तळेगाव दाभाडे, आळंदी नगरपरिषदा, वडगाव, देहू नगरपंचायती, देहू कटक मंडळ, १५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्येच्या तीन ग्रामपंचायती आणि इतर ३९ ग्रामपंचायती आदींचा समावेश आहे. पवना नदीच्या किनारी देखील ज्या ग्रामपंचायतींचे पाणी पवना नदीत मिसळत आहे.

### इथे उभारणार एसटीपी प्लांट..!

» इंद्रायणी नदीच्या काठावर लोणावळा नगरपरिषद, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, आळंदी नगरपरिषद, देहू नगरपंचायत, वडगाव नगरपंचायत, देहू कटक मंडळ, कुसगाव बुद्रुक, कामशेत-खडकाळे, इंदुरी ही १५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्येची गावे, कार्ला, वरसोली, कान्हेवाडी तर्फे चाकण, येलवडी, आंबी, जांभूळ, कान्हे, गोळेगाव, सोळू, तुळापुर, मरकळ, नाणे, टाकवे बुद्रुक, सांगुर्डी, वडगाव शिंदे या १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावांत एसटीपी प्लांट उभारले जाणार आहेत. उर्वरित २४ गावांमध्ये इन सेतू नाला ट्रीटमेंटचा वापर करून मैला शुद्धीकरण करण्याचे काम केले जाणार आहे.

# श्रीराम मंदिर लोकार्पण: पिंपरी- चिंचवडचा 'चौघडा'!

## पिंपरी- चिंचवडचे वादक पाचंगेंना विशेष निमंत्रण

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा मोठ्या उत्साहात लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी अनेक महत्वाचे मान्यवर उपस्थिती लावणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील असणार आहेत. या सोहळ्यासाठी पिंपरी- चिंचवड शहरातील चौघडा वादक रमेश पाचंगे यांची निवड करण्यात आली आहे. रमेश पाचंगे हे गेल्या ४० वर्षांपासून चौघडा वादन करतात. अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मंदिराचं स्वप्न अखेर कित्येक वर्षांनी पूर्ण होत आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अनेक दिग्गज आणि महत्त्वाची मंडळी, नेते सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात चौघडा वादनासाठी पिंपरी-



चिंचवड शहरातील रमेश पाचंगे यांना निमंत्रित करण्यात आले. रमेश पाचंगे म्हणाले, मला खूप आनंद झाला आहे. राम मंदिरात चौघड्याचे नाद घुमणार आहेत. अयोध्येच्या राम मंदिराचे खजिनदार गिरी महाराज यांनी माझी निवड केली आहे. त्यांनी माझा चौघडा ऐकला होता. तेव्हाच त्यांनी म्हटलं होतं की तुम्हाला अयोध्येत घेऊन जाणार. त्यांनी माझा सत्कारही केला होता. खास चौघडा वाजवण्यासाठी आमंत्रित केल्याने मी आनंदी आहे. श्रीरामाच्या मंदिराचा मोठ्या उत्साहात लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी अनेक महत्वाचे मान्यवर उपस्थिती लावणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील असणार आहेत. या सोहळ्यासाठी शहरातील चौघडा वादक रमेश पाचंगे यांची निवड करण्यात आली आहे. रमेश पाचंगे हे गेल्या ४० वर्षांपासून चौघडा वादन करतात. अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मंदिराचं स्वप्न अखेर कित्येक वर्षांनी पूर्ण होत आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे.

# पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकिक वाढवण्यात एचए स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे योगदान!

## हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलचे हीरक महोत्सव वर्ष सुरू

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड या कामगार नगरीचा नावलौकिक वाढवण्यात एच. ए. स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. शहराचा इतिहास लिहिताना हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहावे लागेल. यामध्ये केंद्रीय मंत्रालयात कार्यरत असणारे संकेत भोंडवे, अर्जुन पुरस्कार व शिवछत्रपती पुरस्कार विजेते गोपाळ देवांग, आमदार महेश लांडगे, माजी महापौर आझमभाई पानसरे, योगेश बहल, मनपा विरोधी पक्षनेते कैलास कदम, माजी नगरसेवक हरेश बोधानी, जगदीश शेट्टी, उल्हास शेट्टी, विजय कापसे, सद्गुरू कदम, स्मिता कुलकर्णी, सरपंच विद्या काते – गायकर, डॉ. निलेश भोंडवे, डॉ. गजानन



मंकीकर, डॉ. संदीप भिरुड, डॉ. शंतनू साळवेकर, डॉ. गौरी धायगुडे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता कैलास थोरात, बेल्जियम येथुन आलेले मनोहर नटराजन, नेदरलँड येथून आलेल्या स्नेहा भाडळे – जाधव, गुलाब जाधव, युवराज फाळके, अ‍ॅड. सुशील मंचरकर, अ‍ॅड. मनीषा गवळी, अड. मकरंद गोखले आमदार, खासदारांचे स्विय सहाय्यक म्हणून काम पाहणारे मोहन बाबर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष शशांक परमाणे, उपाध्यक्ष गणेश गांवकर, सचिव आशिष म्हसे, अशोक थोरात, बासरी वादक दिपक गोरखे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल असे प्रतिपादन मुख्याध्यापक सुनील शिवले यांनी केले. माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भूमी पूजन केलेल्या आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्थापन केलेल्या पिंपरीतील हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलचे हीरक महोत्सव वर्ष सुरू आहे. त्यानिमित्त माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने स्नेह मेळावा व कला, प्रदर्शन, नाटक आणि ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्याध्यापिका दीपा अभ्यंकर, माजी मुख्याध्यापक परमजीत कौर, अ‍ॅड. सत्यनारायण शिरुरे, माजी मुख्याध्यापक कमल माने, वर्षा भोपाळे, एच.ए. कंपनी कामगार संघटनेचे विजय पाटील, संजय देशमुख, राजेंद्र एल. जाधव, उमेश कुलकर्णी, शिक्षक प्रतिनिधी रमेश गाढवे, उपकार्याध्यक्ष श्वेता नाईक, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष समाधान गेजगे आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील वर्ग खोली, विज्ञान प्रदर्शन, कलादालनास भेट दिली. या नंतर माजी विद्यार्थ्यांनी ही आवडते मज मनापासून शाळा हे नाटक आणि नृत्य व ऑर्केस्ट्रा सादर केला. नाटकामध्ये विनायक व्ही. जोशी, शितल तारे, मोहन बाबर, रवी पिल्ले, अर्चना गुणे, आरती भट्टाचार्य, एन. एच. लक्ष्मी, अनुराधा पिल्ले, श्रीनिवास कुलकर्णी, राजेश चिट्टे, आरती भट्टाचार्य, राजन गुणवंत, श्रीनिवास कुलकर्णी, विशाल गोराणे, रंजना देसाई, वंदना कोठी यांनी सहभाग घेतला. या नाटकास विद्यार्थी, पालक परिवार व शिक्षकांनी देखील टाळ्या वाजवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संगीता दुधगावकर, विक्रम सिंग गिल, स्वाती पिल्ले, अमृता रावलल्लू, रागिनी मेहता यांनी नृत्य सादर केली. रत्नाकर वरवडेकर, सुरेश शिंदे, उल्हास आंबेकर, सिद्धार्थ रामचंद्रन, राजन गुणवंत, जितेंद्र महाजन, शैलेंद्र भावसार, प्रसाद कोठी, राजेंद्र गावडे, पद्माकर वरवडेकर, सचिन देठे, बिभास मंडल, रवि पिल्ले यांनी ऑर्केस्ट्रा मध्ये भाग घेतला. आमिर शेख व पराग फडकर यांनी आर्केस्ट्राचा सेट अप केला. स्वागत शशांक परमाणे, प्रास्ताविक शीतल तारे, सूत्र संचालन रवि पिल्ले आणि आभार अशोक थोरात यांनी मानले.

# पीसीसीओईची 'हॅकाथॉन २०२३' वर मोहर

## हैद्राबाद येथील महाअंतिम फेरीत प्रथम क्रमांकसह पटकावले एक लाखाचे पारितोषिक

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन विभागाच्या 'हाय ड्रोमाइनेक्स' संघाने भारत सरकारद्वारे आयोजित आणि नल्ला मल्ला अभियांत्रिकी महाविद्यालय, हैद्राबाद, तेलंगणा यांच्या सहकार्याने आयोजित 'स्मार्ट इंडिया हॅकाथॉन




२०२३' च्या महाअंतिम फेरीत प्रथम पारितोषिक पटकावले. पीसीईटीच्या संघाने 'डिफिकल्टी इन ऑपरेटिंग हेवी अर्थ मूव्हिंग मशिनरीज ड्युरिंग द रेनी सीजन' या समस्येचा अभ्यास करून अभिनव प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाला खाण मंत्रालयाच्या अंतर्गत हार्डवेअर प्रकारात एक लाख रुपयांचे पहिले पारितोषिक मिळाले. हायड्रोमाइनेक्स संघाचे नेतृत्व इ अँड टीसी विभागाच्या कौशल लवांडे याने तर आंचल गुल्हाने, अदिती चंदनवार, प्रथमेश चव्हाण, यश जाधव आणि संगणक विभागातून प्रथमेश चौगले यांचा समावेश होता. एनएमआरसीचे अध्यक्ष नल्ला मल्ला रेड्डी, संचालक डॉ. दिव्या नल्ला, खाण मंत्रालयाचे सदस्य राजेश विंचूरकर, एनएमआरसीचे प्राचार्य डॉ.एम.एन.व्ही. रमेश यांच्या हस्ते विजेत्या संघाला गौरवण्यात आले. संघ मार्गदर्शक डॉ. वर्षा हरपळे, प्रा. प्रमोद सोनवणे, प्रा. वैशाली पाटील, डॉ. महेश कोलते विभाग प्रमुखांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीळकंठ चोपडे यांनी अभिनंदन केले.

# पवार यांच्या आदेशाने प्रशासन कामाला

## प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
जिल्हा नियोजन समितीच्या निधीवरून एकीकडे भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या महायुतीत ठिणगी पडली असताना दुसरीकडे प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तत्कालीन पालकमंत्र्यांनी आठ महिन्यांपूर्वी नियोजन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बैठक न घेताच निधी वाटपात बदल करून रखडलेल्या कामांना मंजुरी देण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. नव्या पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करून कामांच्या याद्यांना थेट मान्यता देण्यात येत आहे. निधी वाटपाच्या या कार्यपद्धतीवर आक्षेप घेऊन भाजप आणि शिंदे गटाने न्यायालयात जाण्याचा इशारा दिला असून, याचा फटका जिल्ह्यातील विकासकामांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या बाबत प्रशासनाकडून तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे पळवाट काढण्याची चतुराई दाखवली जात आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार दर तीन महिन्यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक होणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात नवीच पद्धत सुरू झाली आहे. वर्षभरातून अवघ्या दोन बैठका घेतल्या जात आहेत. १९ मे रोजी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या जिल्हा नियोजन बैठकीनंतर अद्याप बैठक झालेली नाही. या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत सदस्यांनाच माहिती नाही. भाजपच्या अनेक सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने जिल्हा नियोजन विभागाने जिल्हा परिषदेकडे मंजूर कामांच्या पडताळणीसाठी दिलेली यादी गुरुवारी (२८ डिसेंबर) परत मागून घेतल्याचे जिल्हा परिषदेकडून सांगण्यात येत आहे. तसेच पालकमंत्र्यांना एकट्यालाच कामांना मंजुरी देण्याचे अधिकार आहेत किंवा नाही या बाबत नियमांचा किस पाडला जात आहे.तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंजूर केलेली कामे नियमानुसार आहेत. मात्र, या याद्यांमध्ये बदल करून ९० टक्के निधी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या सांगण्यावरून वाटप करण्याचे नियोजन झाले आहे. या कामांच्या याद्या जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, या याद्या नियोजन विभागाने परत मागून घेतल्या असल्याचे जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरही प्रश्न उपस्थित होत आहे. राज्य सरकारच्या २०१२-२०१३मधील परिपत्रकानुसार पालकमंत्र्यांना एकट्याला कामांना मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत. तसेच १९८९मध्ये जिल्हा नियोजन समितीचे कार्य आणि अधिकार, चरण वाघमारे यांच्या उच्च न्यायालयातील याचिकेनंतर शासनाने २०१४ मध्ये प्रसिद्ध केलेला आदेश यांची पडताळणी करत नियोजन समिती आणि जिल्हा परिषद यांचे अधिकार अबाधित ठेवण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीचे शासन नियुक्त नामनिर्देशित, मतदानाचा हक्क असणारे सदस्य आहेत. त्यामुळे समितीची बैठक घेऊन कामांचा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्य सरकारच्या निर्देशानुसार दर तीन महिन्यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक होणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात नवीच पद्धत सुरू झाली आहे. वर्षभरातून अवघ्या दोन बैठका घेतल्या जात आहेत. १९ मे रोजी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या जिल्हा नियोजन बैठकीनंतर अद्याप बैठक झालेली नाही.



### याद्या नियोजन विभागाने केल्या परत

**» राज्य सरकारच्या २०१२-२०१३मधील परिपत्रकानुसार पालकमंत्र्यांना एकट्याला कामांना मंजुरी देण्याचे अधिकार नाहीत. तसेच १९८९मध्ये जिल्हा नियोजन समितीचे कार्य आणि अधिकार, चरण वाघमारे यांच्या उच्च न्यायालयातील याचिकेनंतर शासनाने २०१४ मध्ये प्रसिद्ध केलेला आदेश यांची पडताळणी करत नियोजन समिती आणि जिल्हा परिषद यांचे अधिकार अबाधित ठेवण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीचे शासन नियुक्त नामनिर्देशित, मतदानाचा हक्क असणारे सदस्य आहेत. त्यामुळे समितीची बैठक घेऊन कामांचा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, या याद्यांमध्ये बदल करून ९० टक्के निधी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या सांगण्यावरून वाटप करण्याचे नियोजन झाले आहे.**

# न्यू ईयरलाही पुणे - मुंबई एक्सप्रेस वे जॅम..?

## महामार्ग पोलिसांकडून केवळ आवाहन, कारवाई नाहीच

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
दरवर्षीप्रमाणे यंदा देखील नाताळच्या सुट्ट्यांमुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना प्रवश्यांना करावा लागला. पण त्यातून देखील महामार्ग पोलिसांनी धडा घेतलाच नाही का असा सवाल सध्या उपस्थित केला जातोय. कारण आता नव वर्षाच्या सेलिब्रेशनच्या निमित्ताने अवजड वाहतुकदारांना पुन्हा एकदा केवळ आवाहन करण्यातच वाहतूक पोलिसांनी धन्यता मानली असल्याचं म्हटलं जातंय. त्यामुळे नव वर्षाच्या सेलिब्रेशनच्या वेळेस देखील पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना प्रवाश्यांना करावा लागणार असल्याचं म्हटलं जातंय.
बेशिस्त अजवड वाहतूकदार महामार्ग पोलिसांच्या आवाहनाला नेहमीच केराची टोपली दाखवत असल्याचं पाहायला मिळतं. दरम्यान ही बाब मागील आठवड्यातच सिद्ध देखील झालं होती. पण



तरीही पुन्हा एकदा महामार्ग पोलिसांनी केवळ आवाहन केल्यामुळे पुन्हा एकदा प्रचंड वाहतूक कोंडीला आमंत्रण देत असल्याचं म्हटलं जातंय. वाहतूक कोंडीबाबत महामार्ग पोलिसांच्या या भूमिकेमुळे प्रवाश्यांमधून देखील नेहमी नाराजीचा सूर उमटतो. शनिवार ३० डिसेंबर आणि रविवार ३१ डिसेंबर अशा सलग सुट्ट्या आणि नवीन वर्षाचं सेलिब्रेश यासाठी बरेच लोक पर्यटन स्थळांवर जात असतात. त्यामुळे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे. सलग सुट्टी आल्यामुळे घाटमध्ये वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. पण हीच वाहतूक कोंडी फोडण्यासाठी घाट सुरू होण्यापूर्वी जड अवजड वाहनांना थांबविण्यात येते आणि वाहतूक कोंडी संपल्यानंतर जड अवजड वाहनांना पुन्हा एकदा प्रवास करण्यास परवानगी देण्यात येते. मागील वाहतूक कोंडीचे परीक्षण केले असता मागील शनिवारी २४ तासांमध्ये ५५,८६८ वाहने द्रुतगती महामार्गावरील पुणे वाहिनी वरून गेली. मुंबई पुणे जुना महामार्ग छक ४८ या वरून २१,१३५ वाहने गेली. सदर वाहनांना घाटामधील संयुक्तिक मार्गाचा सुद्धा वापर करावा लागतो. इतक्या प्रचंड प्रमाणात वाहने आल्यानंतर घाटामध्ये वाहतूक कोंडी झाली होती.

# डरकाळी फोडणारा वाघ जेव्हा पिंजऱ्यात जातो त्यावेळी वेदना होतात

## अजित पवारांचे नाव न घेता अमोल कोल्हेंची टीका



पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी। वाघ जेव्हा जंगलात असतो तेव्हा तो राजा असतो, पण डरकाळी फोडणारा वाघ जेव्हा पिंजऱ्यात जातो तेव्हा काळजाला वेदना होतात, महाराष्ट्राच्या विकासाठी गेलेल्या वाघाची अवस्था सर्कशी सारखी झाली आहे असं म्हणत राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता टीका केली. महाराष्ट्राचा स्वाभिमान डिवचला जातोय, पण महाराष्टाचे नेते दिल्लीसमोर का उभा राहत नाहीत? असा सवालही त्यांनी विचारला. ते शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते. शेतकरी आक्रोश मोर्चा आजचा तिसरा दिवस आहे. आजच्या तिसऱ्या दिवशी बारामती लोकसभा मतदारसंघातून आक्रोश यात्रा प्रवास करीत आहे. आज बारामती लोकसभा मतदारसंघातील दौंड इंदापूर तालुक्यात रॅली पार पडल्यानंतर आक्रोश मोर्चा गेल्यानंतर बारामती तालुक्यात प्रवेश केला. अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात अमोल कोल्हेंचा शेतकरी आक्रोश मोर्चा येणार असल्याने त्याकडे सर्वांचंच लक्ष होतं. अमोल कोल्हे म्हणाले की, बारामतीत अमोल कोल्हे येणार आणि काय बोलणार याकडं मीडियचे लक्ष लागले होते. सब्र करो, सब्र का फल मिठा होता है. गुडघे टेकवायच की संघर्ष करायचा हा आमच्यासमोर पर्याय होता. आम्ही संघर्ष करायचं ठरवलं. देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताने अमोल कोल्हे म्हणाले की, मी पुन्हा येईल असे म्हणाले की अडीच वर्षात परत येता येतं, पण अर्धचं परत येता येतं. आक्रोश मोर्चामध्ये बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, माझ्या दोन भावांचा सगळ्यात जास्त संबंध इंदापूरशी येतो. श्रीनिवास पवार, शर्मिला पवार, राजेंद्र पवार आणि सुनंदा पवार हे या ठिकाणी येत असतात. गेल्या काही दिवसात काही घटना घडल्या म्हणून आक्रोश मोर्चा आम्ही काढला. अमोल कोल्हे ज्या ताकदीने ते लढत आहेत त्याचे कौतुक आहे. पवार साहेब ज्याला मतदान करा म्हणतात, इंदापूरकर त्यालाच मतदान करतात. त्यांचा शब्द कधीही पडू दिला नाही. सुरवातीला प्रफुल्ल पटेल यांनी आग्रह केला आणि मी निवडणुकीच्या रिंगणात आले. साहेबांची मुलगी आणि दादांची बहिण म्हणून मला तुम्ही मला सुरवातीला निवडून दिले. कितीही दूषित वातावरण असले तरी तुम्ही मला तीन वेळा निवडून दिले, सलग ८ वर्ष बारामती हा एक नंबरचा मतदारसंघ आहे. अजित पवारांच्या वडिलांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केलं. साहेबांमुळे दादा आणि मला सॉफ्ट लॅंडिंग होते. साहेबांनी शून्यातून हे साम्राज्य उभं केलं. जो दिल्लीत मान सन्मान मिळतो तो बारामतीकरांनी निवडून दिल्यामुळे मिळतो. ३८ व्या वर्षी आजपर्यंत कुणीही मुख्यमंत्री झाले नाहीत, शरद पवार झाले. गेल्या काही दिवसात काही घटना घडल्या म्हणून आक्रोश मोर्चा आम्ही काढला. अमोल कोल्हे ज्या ताकदीने ते लढत आहेत त्याचे कौतुक आहे. पवार साहेब ज्याला मतदान करा म्हणतात, इंदापूरकर त्यालाच मतदान करतात. त्यांचा शब्द कधीही पडू दिला नाही. सुरवातीला प्रफुल्ल पटेल यांनी आग्रह केला आणि मी निवडणुकीच्या रिंगणात आले.

### काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?

**» आक्रोश मोर्चामध्ये बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, माझ्या दोन भावांचा सगळ्यात जास्त संबंध इंदापूरशी येतो. श्रीनिवास पवार, शर्मिला पवार, राजेंद्र पवार आणि सुनंदा पवार हे या ठिकाणी येत असतात. गेल्या काही दिवसात काही घटना घडल्या म्हणून आक्रोश मोर्चा आम्ही काढला. अमोल कोल्हे ज्या ताकदीने ते लढत आहेत त्याचे कौतुक आहे. पवार साहेब ज्याला मतदान करा म्हणतात, इंदापूरकर त्यालाच मतदान करतात. त्यांचा शब्द कधीही पडू दिला नाही.**

# कारागृहातील कैद्याच्या खूनानंतर नातेवाईक आक्रमक

## मृतदेह स्वीकारण्यास नकार, पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी। येरवडा कारागृहात कैद्याच्या खुनानंतर मयताचे नातेवाईक पुण्यातील ससून रुग्णालयात आक्रमक झाले आहे. कारागृह पोलिसावर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची त्यांनी मागणी केली आहे. जोपर्यंत पोलिसावर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह स्वीकारणार नाही असा आक्रमक पावित्रा नातेवाईकांनी घेतला आहे. काल सायंकाळच्या सुमारास महेश चंदनशिवे या कारागरातील कैद्याचा कारागृहातील बंदी असलेल्या कैद्यांच्या टोळक्याने खून केला होता. हत्येच्या या घटनेमुळे येरवडा कारागृह पुन्हा एकदा हादरलं होतं. महेश महादेव चंदनशिवे असं हत्या झालेल्या आरोपीचे नाव. पूर्व वैमान्यासातून ४



कैद्यांकडून महेशची हत्या करण्यात आल्याचं समोर आलं होतं. चारही आरोपींच्या विरोधात पुण्यातील येरवडा पोलीस स्थानकात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कैचीने आणि धारदार हत्याराने मानेवर वार करत महेशची हत्या करण्यात आली होती. मात्र यासंदर्भात आता चंदनशिवे यांचं कुटुंब आक्रमक झालं आहे. पोलिसांवर गुन्हा दाखल करा नाही तर मृतदेह स्विकारणार नाही, असं म्हणत कुटुंब आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. ससून रुग्णालयात महेश चंदनशिवेचा मृतदेह ठेवण्यात आला आहे. मात्र नातेवाईक हा मृतदेह स्विकारण्यास नकार देत आहे. ससून रुग्णालयाच्या बाहेर अनेक नातेवाईक जमले आहेत. त्यांनी पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. ज्यावेळी सगळे मिळून महेशला मारहाण करत होते त्यावेळी पोलीस प्रशासन कुठे होतं शिवाय जेल प्रशासनदेखील कुठे होतं? असा प्रश्न नातेवाईकांनी उपस्थित केला आहे. मागील काही तासांपासून नातेवाईकांनी ससून समोर ठिय्या मांडला आहे.